सं.फौ.ख.क्र.१५५/२०२४

नामदेव गोराडे वि. विठ्ठल गोराडे

**निशाणी –**

**शपथेवर पडताळणी**

माझे नांवः नामदेव एकनाथ गोराडे,

वयः ३८ वर्षे, धंदाः शेती,

रा. निल्लोड, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद.

शपथेवर सुरु,

दि.०१.०२.२०२४ रोजी माझी फुलंब्री येथील दुसरे न्यायालयात तारीख होती. त्यादिवशी मी न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आलो व माझे भाऊ विठ्ठल, उत्तम आणि सुधाकर हे उशीरा दुपारी १.४५ वाजेपर्यंत आले. त्यानंतर मध्यान्हामुळे न्यायालय उठले असल्याने आम्ही सर्व नाश्ता करण्यासाठी फुलंब्री बसस्टँडसमोरील हॉटेलमध्ये गेलो. दुपारी ३.३० वाजता आम्ही नाश्ता करत असतांना माझा भाऊ विठ्ठल याने शेती वाटुन द्या असे सांगितले. त्यावर मी म्हणालो की, तुला शेती वाटुन दिलेली आहे दादा, तु मोठा भाऊ आहे, तु आम्हाला वाटुन दिलेली शेती नावाने करुन दिली पाहिजे. तसेच तलाठी मॅडमच्या पुढे आमच्या सह्या लागल्या तर तुला देतो असे मी त्याला सांगितले.

२. असे बोलल्यानंतर माझा भाऊ विठ्ठल याने माझी गची धरली आणि मला मारायला सुरुवात केली. त्यानंतर सोबत असलेले उत्तम आणि सुधाकर यांनी मला विठ्ठलच्या तावडीतुन सोडविले. त्यानंतर विठ्ठल याने मला धमकी दिली की, आता दोन भाऊ आहे, तु कधी एकट्यामध्ये मला भेट, तुला मारुन टाकतो. त्यानंतर विठ्ठल तेथुन निघुन गेला व न्यायालयात देखील आला नाही. त्यानंतर मला भिती वाटु लागली त्यामुळे मी फुलंब्री पोलीस ठाणे येथे जाऊन विठ्ठल विरुध्द तक्रार नोंदविली. पोलीसांनी त्याच्यावर अदखलपात गुन्हा नोंदविला. त्यानंतर मी न्यायालयात सदरची फिर्याद दाखल केली.

14/03/2024

**(व्ही. व्ही. रावजाडेजा)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फुलंब्री**

**दि.१४.०३.२०२४**

तक्रारदाराची सही